महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
जनसंपर्क विभाग
कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.
दू.क्र. ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल : cpromhadaoffice@gmail.com

=====================================================================

जावक क्रमांक – ७१४ /२८ दिनांक :- २८ फेब्रुवारी, २०२५

प्रसिद्धिपत्रक

**नागरिकांच्या तक्रारी सोडविण्यासाठी विभागीय मंडळांनी महिन्यातून दोन वेळा जनता दिन आयोजित करा** - 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांचे निर्देश

म्हाडाच्या मुंबईसह महाराष्ट्रातील सर्व विभागीय मंडळांच्या १०० दिवसांच्या कृती आराखड्याच्या अंमलबजावणीचा श्री. जयस्वाल यांनी घेतला आढावा

मुंबई, दि. २८ फेब्रुवारी, २०२५ :- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या (म्हाडा) सर्व विभागीय मंडळांनी १०० दिवसांच्या सात कलमी कृती आराखड्यातील "नागरिकांच्या तक्रारींचे निवारण" या महत्त्वपूर्ण घटकाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महिन्यातून किमान दोन वेळा जनता दिन आयोजित करावा, असे निर्देश 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांनी दिले. या जनता दिनात नागरिकांना प्रत्यक्ष सहभाग घेता यावा, यासाठी महसुली विभागातील संबंधित जिल्ह्यांमध्ये दूरदृष्य प्रणालीद्वारे अर्जदारास उपस्थित राहण्याची व्यवस्था करण्यात यावी, असेही त्यांनी सांगितले.

नागरिकांचे दैनंदिन जीवन सुखकर करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या प्रशासनिक विभागांकरिता मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या निर्देशानुसार व राज्याचे उपमुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री श्री. एकनाथ शिंदे यांनी केलेल्या सूचनेनुसार १०० दिवसांचा कृती आराखडा निश्चित करण्यात आला आहे. म्हाडाच्या मुंबईसह महाराष्ट्रातील सर्व विभागीय मंडळांच्या १०० दिवसांच्या कृती आराखड्याच्या अंमलबजावणीचा आढावा श्री. जयस्वाल यांनी आज म्हाडा मुख्यालयात घेतला.

श्री. जयस्वाल म्हणाले की, शंभर दिवसांच्या सात कलमी कृती आराखड्यामध्ये समाविष्ट प्रकल्पांची प्रशासकीय व तांत्रिक मान्यता तात्काळ घेऊन एका आठवड्यात निविदा प्रसिद्ध कराव्यात. कृती आराखड्यातील प्रकल्पांसाठी निविदा प्रक्रिया राबवताना नव्याने जारी निर्णयानुसार निविदेचा कालावधी कमी ठेवावा. म्हाडाच्या विभागीय मंडळांनी कार्यालयात स्वच्छता मोहीम राबवावी व त्याचा कार्यवाही अहवाल छायाचित्रांसह पाठवण्याचे निर्देश श्री. जयस्वाल यांनी दिले. कार्यालयामध्ये दिशादर्शक फलक, अभ्यंगतांसाठी बसण्याची व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची सोय, दिव्यांगांसाठी रॅम्प, कार्यालय परिसराचे सौंदर्यीकरण करावी, विभागीय मंडळाच्या प्रत्येक कार्यालयात हिरकणी

कक्ष स्थापन करावेत व त्या कक्षामध्ये सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश श्री. जयस्वाल यांनी दिले.

म्हाडा विभागीय मंडळ स्तरावरील गृहनिर्माण प्रकल्पांमध्ये गुंतवणूक वाढावी यासाठी विभागीय मंडळांनी गुंतवणूकदारांची बैठक बोलावून 'म्हाडा'च्या गृहनिर्माण प्रकल्पांसाठी विकासकांना गुंतवणूक करण्यास प्रवृत्त करावे, अशा सूचना श्री. जयस्वाल यांनी दिल्या.

विभागीय मंडळांच्या मुख्य अधिकारी यांनी दर मंगळवारी क्षेत्रीय प्रकल्पांना भेटी द्याव्यात व त्याचा अहवाल सादर करण्याचे निर्देश श्री. जयस्वाल यांनी दिले. कृती आराखड्यानुसार म्हाडाच्या सर्व विभागीय मंडळांनी म्हाडाच्या माहिती व संचार तंत्रज्ञान विभागाशी समन्वय ठेवावा व संकेतस्थळावरील माहिती अद्ययावत ठेवण्यासाठी समन्वय अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याचे निर्देश श्री. जयस्वाल यांनी दिले.

यावेळी श्री. जयस्वाल यांनी प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंमलबजावणीबाबत म्हाडाच्या विभागीय मंडळांचा आढावा घेतला. लाभार्थ्यांचे जिओ टॅगिंग करून एमआयएस पोर्टलवर अधिकाधिक लाभार्थ्यांची संलग्नता तात्काळ करून घेण्याचे निर्देश दिले.

म्हाडातर्फे लोकसेवा हमी कायद्याअंतर्गत दिल्या जाणाऱ्या सुविधांमध्ये वाढ करण्यासाठी कोणत्या सुविधांचा समावेश करता येईल, याबाबत प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश श्री. जयस्वाल यांनी दिले.

यावेळी म्हाडाचे मुख्य अभियंता श्री. महेशकुमार जेसवानी, श्री. शिवकुमार आडे, वित्त नियंत्रक श्री. अजयसिंह पवार, म्हाडाच्या सचिव श्रीमती नीलिमा धायगुडे, मुख्य वास्तुविशारद व रचनाकार श्री. प्रवीण साळुंखे आदी उपस्थित होते.

###

(वैशाली गडपाले)

मुख्य जनसंपर्क अधिकारी / प्राधिकरण

---

**Maharashtra Housing & Area Development Authority**

Public Relations Department

Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra East, Mumbai-400051. Email : cpromhadaoffice@gmail.com

==================================================================

Outward No. : 714/28 Dt. February 17, 2025

Press Release

# Public Complaint Redressal Strengthened: MHADA to hold Janata Din twice every month

MHADA's VP & CEO Sanjeev Jaiswal, IAS, directs firm implementation under the 100-Day Action Plan

Mumbai, February 28, 2025 – Maharashtra Housing and Area Development Authority (MHADA) Vice President and Chief Executive Officer, Mr. Sanjeev Jaiswal, has instructed all divisional boards to organize Janata Din twice a month to ensure prompt resolution of citizen grievances. This initiative, a key part of MHADA's 100-day action plan, aims to provide citizens with direct access to grievance redressal mechanisms. To facilitate participation, arrangements will be made for applicants to join these hearings via video conferencing from their respective districts.

The 100-day action plan, formulated under the directives of Chief Minister Shri Devendra Fadnavis and the guidance of Deputy Chief Minister and Housing Minister Shri Eknath Shinde, is being implemented across all MHADA divisional boards. Mr. Jaiswal conducted a detailed review of its execution today at MHADA headquarters and issued directives to ensure swift and effective implementation.

He stated that all administrative and technical approvals for the projects included in the seven-point action plan of the 100-day program should be obtained immediately, and tenders should be published within a week. To enhance efficiency, the duration of the tender process for projects in the action plan should be reduced as per the newly introduced decision. Additionally, divisional offices have been instructed to conduct cleanliness drives and submit compliance reports with photographic evidence. Offices must also improve public amenities by installing clear signboards, arranging proper seating for visitors, ensuring clean drinking water, and enhancing accessibility with ramps for differently-abled individuals. Furthermore, each divisional office is required to set up a dedicated Hirakani Kaksha, a dedicated facility with essential amenities for breastfeeding mothers and expectant women.

To encourage private investment in housing projects, Mr. Jaiswal directed divisional boards to hold meetings with potential investors and developers, encouraging them to participate in

MHADA's housing initiatives. Additionally, divisional officers must visit project sites every Tuesday and submit progress reports. To ensure seamless execution of the action plan, MHADA's divisional boards must coordinate with the Information Technology department and appoint dedicated officers to regularly update information on the official website.

Mr. Jaiswal also reviewed the progress of housing projects under Pradhan Mantri Awas Yojana (Urban) and instructed officials to accelerate the geotagging of beneficiaries and ensure their immediate integration into the MIS portal. Additionally, he directed that a proposal be submitted for expanding citizen services under the Public Services Guarantee Act.

The meeting was attended by MHADA's senior officials, including Chief Engineers Mr. Maheshkumar Jeswani and Mr. Shivkumar Aade, Finance Controller Mr. Ajaysingh Pawar, Secretary Mrs. Neelima Dhaigude, Chief Architect and Planner Mr. Pravin Salunkhe, along with other key officials.

###

(Vaishali Gadpale)
Chief Public Relations Officer, MHADA


100 DAYS AGENDA
Bisleri

